राज्यातील दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिकाऱ्यांच्या नवीन परिभाषित अंशदान निवत्तीवेतन योजनेप्रमाणे (DCPS) वेतनातून नियमाप्रमाणे दरमहा करण्यात येणारी कपात तात्काळ थांबविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :-एचटीसी-१२१६/५६/प्र.क्र.१५/का.तीन,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-१७ मे, २०१८.

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५.
२) शासन परिपत्रक, विधि व न्याय विभाग, क्र.एचसीटी-२०११/प्र.क्र.१२/का.३, दि.११.०३.२०११.
३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे जनहित याचिका क्र.१८८/२०१५, दि.११.०८.२०१७ चे आदेश.
४) मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे रिट याचिका क्र.६४३/२०१५, दि.२७.०३.२०१८ चे आदेश.

<u>प्रस्तावना</u> :-

संदर्भाधीन क्र.१ अन्वये शासनाने असा निर्णय घेतला आहे की, शासन सेवेत दि.०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी, सध्या अस्तिवात असलेल्या निवृत्तिवेतन योजनेऐवजी, केंद्र शासनाच्या धर्तीवर, नवीन "परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना" (Defined Contribution Pension Scheme) लागू केली आहे.

२. उपरोक्त निवृत्तिवेतन योजना ही दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यांनतर नियुक्त झालेल्या राज्यातील दुय्यम न्यायालतील न्यायिक अधिकाऱ्यांना लागू करण्याच्या निर्णयास श्री.विहार दुर्वे व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.१८८/२०१५ अन्वये आव्हानीत केले .

३. सदर न्यायालयीन प्रकरणासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दि.११.०८.२०१७ च्या आदेशान्वये पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत :-

(i) We hold that the impugned Government Resolution dated 31 st October, 2015 is not applicable to the Judicial Officers in the State who were appointed on or after 1st November 2005. The said officers will be entitled to the same pensionary benefits which are available to the judicial officers appointed before 1st November 2005. However, the Judicial Officers who are appointed on or after 1st November 2005 will have an option to continue under the New Scheme;

(ii) The State Government shall give an option to the Judicial Officers appointed after cut-off date (31st October 2005) to continue under the New Scheme under the impugned Government Resolution. The option shall be exercised within a period of two months from today. The judicial officers who fail to exercise the option will be governed by pension scheme which is applicable to all judicial officers appointed before 1st November 2005.

(iii) In case of those judicial officers who do not opt to continue with the New Scheme under the impugned Government Resolution, the entire contribution deducted from their salary along with the return/interest accrued thereon shall be transferred from their respective "Pension Tier-I Account" to their "Voluntary Tier - II Withdraw able Account" within a period of three months from today. We make it clear that the State Government's Matching Contribution with interest/return accrued thereon shall not be transferred as aforesaid and the State Government shall be entitled to withdraw the same from Tier-I account. The Judicial Officers will be entitled to withdraw the amount as and when the same are transferred to "Voluntary Tier -II With drawable Account".

३. मा.उच्च न्यायालयाच्या दि.११.०८.२०१७ च्या आदेशाविरुध्द शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका क्र.३१४६१/२०१७ दाखल करुन आव्हान दिले होते आणि आदेशाच्या अंमलबजावणीस स्थगिती देण्याची विनंती केली होती. तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाने आादेशांच्या अंमलबजावणीस स्थगिती दिली नाही व रिट याचिका क्र.६४३/२०१५ या न्यायालयीन प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२७.०३.२०१८ रोजी विशेष अनुमती याचिका क्र.३१४६१/२०१७ निकाली काढली आहे. त्यामुळे मा.च्च न्यायालय,मुंबई यांनी दि.११.०८.२०१७ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिकाऱ्यांच्या नवीन परिभाषित अंशदान निवत्तीवेतन योजनेप्रमाणे (DCPS) वेतनातून नियमाप्रमाणे दरमहा करण्यात येणारी कपात थांबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील दुय्यम न्यायालयातील दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या न्यायिक अधिकाऱ्यांच्या वेतनातून वित्त विभागाच्या शासन निर्णय दि.३१.१०.२००५ नुसार नवीन परिभाषित अंशदान निवत्तीवेतन योजनेनुसार (DCPS) नियमाप्रमाणे दरमहा करण्यात येणारी कपात तात्काळ थांबविण्यात यावी.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ९४/ २०१८/ सेवा-४, दि.०५.०५.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेताक क्र. २०१८०५१७१७३२२४१५१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amogh Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4ed d56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89 497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2018.05.17 17:33:41 +05'30'

(अ.श्या.कलोती)
**विधि सल्लागार नि-सह सचिव.**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव,

२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

३. मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद/विधानसभा,
४. मा.राज्यमंत्री (विधि व न्याय) यांचे स्वीय सहायक,
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
६. अ.मु.स. (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. प्रधान सचिव (विधि विधान), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
११.निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,(२ प्रती)
१२.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
१३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
१४.प्रधान महालेखापाल-एक/दोन (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१५.प्रधान महालेखापाल-एक/दोन (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१६.प्रमुख न्यायाधीश, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई,
१७.मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई,
१८. सर्व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
१९.प्रमुख न्यायाधीश, सर्व कौटुंबिक न्यायालये,
२०.मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई,
२१.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२२.वित्त विभाग/व्यय-५, व सेवा-४
२३.विधि व न्याय विभागातील सर्व शाखा व कार्यासने,
२४.निवड नस्ती/का.३.